# गी हलते आहे

अर्जुन डांगळे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2392



REFBK-0021776
REFBK-0021776

वि.क्र.
2392

२९७७६
संदर्भ
२३/८/७७

३/०२१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 2392
29776 काव्य

REFBK-0021776

REFBK-0021776

# छावणी हलते आहे

# छावणी हलते आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३७२ काव्य
दा. क्र.
२७८८५
शाखा (स्थळ प्रत)

अर्जुन डांगळे

।। कर्मवीर प्रकाशन ।। मुंबई.

प्रथमावृत्ती

१४ एप्रिल १९७७

C सौ. चारुशीला डांगळे

वेष्टण

**सुभाष तेंडले**

प्रकाशिका

**सौ. सुशीला मधुकर तुपलोंढे**
कर्मवीर प्रकाशन,
११/७, पार्कसाइट कॉलनी, विक्रोळी, मुंबई ४०० ०७९

मुद्रक

**रामचंद्र अ. वाडेकर**
कृष्णा आर्ट प्रिन्टरी,
बी/८, ससेक्स इंडस्ट्रीयल इस्टेट, भायखळा, मुंबई ४०० ०२७

**किंमत सहा रुपये फक्त**

## पूर्वप्रसिद्धि

१९६७ – १९७७

अस्मितादर्श, निकाय, मागोवा, प्रतिष्ठान, साधना, मांडवी, आम्ही, मराठवाडा, लोकवाङ्मय, ज्वाला, युंगातर, साम्यवादी, विद्रोह, संसद इ. नियतकालिकांतून

माझा हा पहिलाच कवितासंग्रह. सौ. सुशीला मधुकर तुपलोंढे, दया पवार, सुभाष तेंडले, मधुकर तुपलोंढे, सौ. चारुशीला डांगळे, प्रबोध करंदीकर, रामचंद्र अ. वाडेकर व प्रेस मधील कामगार बंधू या सर्वांचे सहकार्य व जिव्हाळा या संग्रहाच्या पाठीशी आहे. दलित साहित्य चळवळीतील जेष्ठांनी आणि मित्रांनी केलेले कौतुक आणि मार्गदर्शन, त्याचप्रमाणे ज्या संपादकांनी माझ्या कविता प्रसिद्ध केल्या त्या सर्वांना विसरणे शक्य नाही. असो.

अर्जुन डांगळे

७/१३४, जयविक्रान्त,
सहकार नगर नं. ५,
चेंबूर, मुंबई ४०००७१

आंबेडकरी चळवळीचे जे पायाचे दगड झाले
त्या पिढीतील तमाम निष्ठावंत
ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांना विनम्र अभिवादन !

# दोन शब्द......

अर्जुन डांगळे हा माझा जवळचा मित्र. त्याच्या आग्रहापायी कविता संग्रहावर दोन शब्द लिहिण्याची पाळी आली आहे. 'महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभेच्या' वतीने १९६७ साली सोळा दलित कवींचा 'आकार' नावाचा कविता संग्रह प्रसिद्ध करण्यात आला होता. या कविता संग्रहात माझ्या कविता बरोबरच अर्जूनच्याही कविता प्रसिद्ध करण्यात आल्या. गेल्या दशकात नव्या जाणीवांचे जे दलित साहित्य तरारून वर आले त्याची त्यावेळी कुठे लागण झाली होती. हा नवा वाङमय प्रकार लिहिण्यास बहुधा आम्ही दोघांनी एकाच कालखंडात सुरवात केली असावी. योगायोगाने माझा कविता संग्रह 'कोंडवाडा' हा प्रथम प्रसिद्ध झाला. अर्जुनचे कवितेतले व्यक्तिमत्व संग्रह रूपाने सामोरे यायला आजचा दिवस उगवायला लागला. मला दोन शब्द लिहिण्याचा त्याचा आग्रह हा त्याच्या मनाचा मोठेपणा. अर्जुन जवळचा मित्र. त्यामुळे त्याच्या कवितेवर अलिप्तपणें लिहिणे हे तसे कठीण. त्यात पडलो मी एक कवी. हा प्राणी तसा जादा अहंकारी. आपल्या पेक्षा दुसरा चांगला जन्मलाच नाही असा अभिनिवेश बाळगणारेच जादा. ह्या सर्व किल्मिषाचे गढूळ पाणी दूर करून अर्जुनच्या कवितेतला झरा शोधण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न.

अर्जुनची कविता तपासण्यापूर्वी त्या कालखंडात मराठी कवितेचा नेमका प्रवाह कसा होता, ह्या कवितेच्या प्रभावाखाली न येता अर्जुनने आपली स्वतंत्र वाट कशी चोखाळली हे पहावयाला हवे. १९६७ च्या आगेमागे कलावादी कवितेचा किती दबदबा ! पण त्यातील बरीचशी कविता ही प्रतिमांच्या आवर्तनात एखाद्या पालापाचोळ्यासारखी भिरभिरत होती. जो कवि दुर्बोध, क्लिष्ट, अनाकलनीय लिहिल तो श्रेष्ठ कवी असा संकेत होता. प्रस्थापित साहित्य संप्रदायाला छेद देण्याच्या कल्पनेतून लिटल् मॅगेझीनवाल्यांची चळवळ ह्याच कालखंडात मराठीत फोफावलेली. प्रस्थापित साहित्य संप्रदायाला विरोध म्हणजे 'सत्यकथेला' विरोध येवढीच या विरोधाची धार होती. सत्यकथेतील कवितांपेक्षा जाणिवेच्या पातळीवर वेगळेपण हे केंव्हांच दिसून आले नाही. पाली, झुरळे, घोडा, सरडे, अथवा तरूणीच्या स्तनावरील तीळाभोवतीच ही कविता रुंजी घालत होती.

कलात्मक घाट, आकृतिबंध, चित्रशिल्प ह्या शद्बांचा कीस पाडला जात होता. ही कविता भूमितीच्या आकृतीत किंवा शास्त्रोक्त रागाच्या सुरावटीत तपासली जात होती. जेवढया प्रमाणात साहित्यिक सामूहिकतेकडे खेचला जाईल तेवढा त्याच्या लेखनातला कस कमी होत जाईल अशी समीक्षकांचीही धारणा होती. 'मैं भाभी को कहा भाईकी डयुटी चलाऊँगा क्या? तो भडक गयी साली' किंवा 'तीन हीजडे तोळाभर सोने घेऊन गेले सोनाराकडे मंगळसूत्र घडवायला' अशा आशयाच्या कवितेचे मुबलक पीक आले. ह्या विचारसरणीतून हा कवी नाळ कापल्यासारखा समाजापासून दूर जाऊ लागला. समाजाच्या दुःखापासून, त्याच्या सांस्कृतिक संघर्षापासून ह्या कवीने फारकत घेतली. मूलभूत अशा सामाजिक संघर्षाला भिडण्याची त्याची तयारी नव्हती. समाजाच्या तळगाळाची त्याला खेद अगर खंत वाटत नव्हती. 'केवळ पोकळी कडून पोकळी कडे' अशी त्यांची कवितेतली वाटचाल होती. दलित कविता ही मर्ढेकरी संप्रदाय आणि नवकवींच्या खांद्यावर अुभी आहे असे बोलले जाते पण ही भूमिका म्हणजे सत्य दडविण्याचा प्रयत्न आहे. मर्ढेकर काय किंवा त्या वेळचे नवकवी काय हे माणसाला जंतू सारखे मानत होते. यंत्रयुगाची भीषणता की जी पाश्चिमात्यांनी भोगली होती त्या जाणीवेचे मराठीत कलम म्हणजे अंधानुकरण होते. यंत्रयुगच खरी आपली मुक्तता करील अशी मानसिकता असणाऱ्या दलित कवींना हे मनोविश्लेषण कसे जवळचे वाटावे? दलित कवींची मानसिकता शोधायची असेल तर तिची पाळेमुळे ही येथील प्रवोधनाच्या चळवळीत शोधावी लागतील.

१९३५ च्या आगेमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे बंड उभारले त्या कालखंडात जन्माला आलेली पिढी आज जीवनाच्या अुंबरठयावर आली आहे. ह्यातील कलावंत सुशिक्षित झाल्यामुळे जादा संवेदनाशील झाला. दुःखाचे अनेक पदर त्याच्या ध्यानी येऊ लागले. तो जसा काही प्रमाणात मध्यमवर्गात दाखल होत होता, त्या प्रमाणात जुन्या पांढरपेशीवर्गाशी त्याचा जाणीवेच्या पातळीवर अटळ संघर्ष सुरू झाला. समाजातील जडण-घडण, जातीव्यवस्था एखाद्या मडक्यांच्या उतरंडी सारखी. एक जात नेमकी दुसऱ्या जातीच्या तोंडावर बसलेली. त्यामुळे गुदमरलेली अवस्था. अस्पृश्य-तेतील भीषणता, तिचे दारुण हीन दीन स्वरुप, गेल्या काही वर्षात विकें-द्रीकरणाच्या नावाखाली झेड्पी, साखरकारखाने, भूविकास बँका, सोसायटया

ह्यातून अष्टभूजा देवीसारखा मातलेला नवा धनीक सत्ताधिशांचा वर्ग, त्यामुळे खेडयापाडयात होणारे दलितांवरचे अत्याचार इ. शोषणांचे सर्व प्रकार दलित कलावंताना स्वच्छपणे दिसू लागले. त्यांचा बंदिस्त आत्मा सुरुंगाच्या दारुसारखा उकळू लागला. त्याच्या तोंडातून अग्नीची फुले पडू लागली. ह्या सर्व जाणीवानांच पुढे दलित साहित्य ही संज्ञा मिळाली.

आजवर दलित कविता अनेक मासिके, वर्तमानपत्रे ह्यांच्या पानापानातून विखुरली आहे. त्यापैकी काही संग्रहरुपाने प्रसिद्ध झाली. 'गावकुसाबाहेरची कविता,' 'अंगारा,' 'गोलपिठा,' 'कोंडवाडा', 'पिंपळपान' 'सुरुंग', 'ऑडिट', 'नाकेबंदी' ही त्यातील काही ठळक नावे. ह्या संग्रहांनी मराठीत आपले वैशिष्ठ्यपूर्ण असे स्थान निर्माण केले आहे. ह्या कवितांचे वेगळेपण जसे रचनेत, भाषेत, विषयात आहे तसे ते नावातही आहे. ज्ञानेश्वरा-पासूनची सर्वच कविता ही अध्यात्म, प्रेम, निसर्ग, पाने, फुले, समुद्र, कातरवेळ ह्यांना वाहीलेली. दलित कवितेच्या रुपाने ती प्रथमच तळगाळात अवतरली आहे. कवि म्हणजे द्रष्टा, चिरंतन मूल्ये कवितेत जपणारा, मानवता-वादाचा भव्य कॅनव्हास त्यांनी घ्यायला हवा असे म्हणत असताना ह्या कवितेला दलित जीवनाचे बारकावे, त्यांचा जगण्याचा संघर्ष, त्यांची मानसिकता आपल्या भव्य कॅनव्हासवर भरता येवू नये असे एकंदरीत मराठी कवितेचे स्वरुप झालेले. ह्या स्वप्नरंजनात्मक अथवा भाबडया मानवता-वादाच्या कल्पनेला प्रथम दलित कवितेने जमीनीवर उतरावयास भाग पाडले आहे. ह्या सर्व कविताप्रवाहाला गती देणारा प्रवाह म्हणजे अर्जुनचा 'छावणी हलते आहे' हा संग्रह सांगता येईल. आजवरच्या दलित कविता संग्रहाच्या नावात जो स्थलवाचक भाव होता तो पायंडा अर्जुनने मोडला आहे. छावणी आहे. पण ती हालणारी छावणी आहे. छावणी अनेक प्रकारची असू शकते. फलाटावर सांडणारी दुष्काळग्रस्तांची छावणी, निर्वासितांची छावणी, तशी संघर्षाच्या पवित्र्यांत बिगुल वाजवणारी

युद्धाची छावणी. ह्या छावणीचे गाणे आजवरच्या परंपरागत स्वरांपेक्षा वेगळे आहे. या गाण्यात निग्रोच्या जाझ संगीताची धून आहे. कवि म्हणतोय :

**तू गात रहा**
**भूके कंगालाचा जूलुस होऊन**
**तू गात रहा**
**मूक्तिवाहिनी किंवा व्हिएतनामी होऊन**
**तू गात रहा**
**चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन**
**तू गायला हवे**
**त्यांनी त्यांच्या बंदिस्त सूर्याकडे कूच करेपर्यंत**
**तू गा .....गा ...... गा .....बिनधास्त गा ...**
**छावणी हलू लागली आहे.**
**छावणी हलते आहे.**

अशी ही हालणारी छावणी आपल्या भूतकाळाकडे पाठ फिरवून चालत नाही. अथवा दलितांच्या दु:खाशी नाते तोडत नाही. भोगलेला भूतकाळ एखाद्या फोडासारखा मनात ठसठसत असतो. गावकुसाबाहेरचे नरकाचे जीवन त्याच्या वाटयाला आलेले असते. ग्रॅज्युएट होऊनही टीचभर पोटासाठी एम्लायमेंटच्या पायऱ्या तो झिजवू लागतो. शहरात आला तर त्याला लेबर कँम्पच्या झोपडपट्टीत कोंडले जाते. त्यासंबंधीचा संताप अगतिकता, घृणा आणि नवीन जीवनाचा वेध घेण्याची युयुत्सु वृत्ती याचे प्रभावी दर्शन त्याच्या कवितेत होऊ लागते. जवळ जवळ सर्वच दलित कवींच्या कवितेत 'आई' येते. मराठीला आई काही तशी नवी नसते. प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई अशी विश्वात्मक आईची संकल्पना मांडणारी आई अवतरते. खरेच दलितांच्या वाटयाला अशी आई येते काय ? तिच्या मनातला वात्सल्यसिंधू वास्तवतेच्या दाहक वाळवंटात करपून गेलेला असतो. परिस्थितीच्या चक्रात तिच्या इच्छा आंकाक्षा ऊसाच्या चिपाडासारख्या झालेल्या असतात. जेव्हां चूल थंडगार पडलेली असते आणि भोवती चिल्लीपील्ली भूकेमुळे आकांत करीत असतात त्यावेळी ही आई मुलांच्या पाठीत धपाटे घालते व म्हणते 'गाभरांनो, माझ मढं चूलीत घालू काय ? आईचे नैसर्गिक वात्सल्य, प्रेम येथे गायब झालेले

असते. अशीच आई आपणास नारायण सुर्वेंच्या कवितेत सापडते. ह्या आईच्या श्रमाला उत्पादन व्यवस्थेत तरी स्थान असते. पण ह्या देशात असंख्य आया अशा आहेत की त्या खेडयात सरवा, लाकूड वेचतात, शहरात चिंध्या, कागद, लोखंड, बाटल्या, कांचा वेचून आपला चरितार्थ चालवितात. अशा आईचे दु:ख दलित कवितेत सापडते. अर्जुनचीही एक अशी आई भेटते.

**रणरणत्या उन्हाच्या छाताडावर पाय ठेवून धारावीच्या कचरापट्टीत**
**गळयात गोणपाट अडकवून लोखंड कांचा लाकडे वेचणारी आई**
**पोट जाळण्यासाठी लोखंड-कांचा अड्डुल भंगारवाल्याला विकी**
**अन् चुलीला जाळण्यासाठी लाकडे घरी घेऊन येई**
**चुलीतली लाकडे फुंकत आई आमचा अभ्यास बघत राही**
**धूर नसतांना देखील उगाचच तिच्या डोळयात पाणी वाही**
**भाकरी थापण्याच्या आवाजाने पुस्तकातली अक्षरे उडू लागत**
**तिच्या खरपूस वासाने आमची आतडी तुटू लागत.**

अशी एक एक कविता आपण जेव्हां वाचू लागतो तेंव्हा त्या सर्व कविता जीवनाच्या आयुष्याची एक दीर्घ कविता होऊन जाते. वर्तमान आणि भूतकाळात एखाद्या गलोली सारखी ताणली जाते.

दलित साहित्यिकांकडे पाहाताना काही मंडळींचा मोठा गंमतीदार संवाद कानावर येतो. 'अहो हे कसले दलित ? चांगल्या पगाराची नोकरी, रहायला फ्लॅट, यांचा टीपटॉप पोषाख, हे तर दलितातले ब्राह्मण.' मला वाटते, याचा अर्थ ह्या लेखकांनी लंगोटी लावली असती म्हणजे त्यांना हे दलितांचे प्रतिनिधी वाटले असते ! ह्या वरवरच्या दृश्यापाठीमागे दलित लेखकांच्या डोळयांत तुम्ही कधी डोकावून पाहिले आहे काय ? अर्जुनच्या डोळ्यात मी अनेकदा डोकावलो आहे. तशी त्याला सारी भौतिक सुखे आज मिळतात. तरी तो खूपच बेचैन. ही बेचैनी अस्वस्थता आली कुठून ? जणू काय त्याच्या डोळयांतून बॉम्बस् फुटणार आहेत. फलाटावर सांडलेला दुष्काळग्रस्तांचा तांडा पाहून तो म्हणतोय :

बाबांनो, मायबाप हो, उरात दाटलेले असंख्य बॉम्बस्
फूटुन निघतील वेळी अवेळी तुमच्या भेटीसाठी
थेंबभर पाण्यासाठी, कोरभर तुकडयासाठी
वणवण फिरणारांना भूमी मिळवून देण्यासाठी.
फलाटावर सांडलेला दुष्काळग्रस्तांचा प्रचंड तांडा
माझ्या उरात किती बॉम्बस् पेरून ठेवणार
अन् असाच बघत मी किती वेळ थांबणार.

कवीचे हे बेंबीच्या देठाचे ठसठसणे. ज्याचे दुखते त्यालाच ह्या वेणा कळाव्यात. भोगलेला दारुण भूतकाळ आणि मिळालेली वैज्ञानिक समाजशास्त्रीय दृष्टी, त्यामुळे अनुभवाकडे पाहाण्याची आलेली वेगळी दृष्टी, ही दृष्टी केवळ वास्तवता चितारत नाही तर त्या वास्तवतेला क्रांतिकारक अर्थ दिला जातो. ह्या क्रांतिकारक जाणीवेमुळे महाडचा पाण्याचा लढा आठवतो. व्हिएतनामी जनतेने केलेला रणसंग्राम आठवतो. वरळीची ठिणगी जशी आठवते तशी ऑक्टोबर क्रांति आठवते. आमार सोनार बांगला, तेलंगणाचा लढा हे सारे लढे दडपलेल्या मानव समूहाच्या मुक्तीचा इतिहास कवीला वाटतो आहे. कवीची ही विश्वात्मक चिरंतन दुःखाची दृष्टी राडारसारखी जगाच्या नकाशावर भिरभिरते आहे. पायाखाली काय जळते आहे याचेही भान आहे. ही व्यापक जाणीव आंबेडकरी जाणीवांशी विसंगत आहे असे काहींना वाटते. पण कवीला तसे वाटत नाही. एकीकडे आम्ही बुद्धाच्या दुःखाचा व्यापक अर्थ ध्यानी घेतो. त्यांनी ज्या दुःखाला वाचा फोडली ते केवळ आत्मा, पुनर्जन्म, नियती ह्या चक्रातले दुःख नव्हते तर माणसाचे भौतिक, सामाजिक अशा अनेक अंगाने जे शोषण केले जाते त्यात बुद्धाच्या 'दुःख' ह्या कल्पनेचा अर्थ सामावलेला आहे असेही आम्ही आग्रहाने मांडतो. पण एकीकडे अशी व्यापक मांडणी मान्य करायची आणि दुसरीकडे संकुचित भूमिका घ्यायची असा काहीसा प्रकार दलितांपैकी काही सातत्याने मांडत असतात. दलित साहित्य म्हणजे केवळ अस्पृश्यता आणि गावकुसाबाहेरच्या समूहाच्या दुःखाना स्पर्श करते अशी व्याख्या करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अशी तुकडया-तुकडयाची विभागीय विचारसरणी मांडल्यामुळेच ह्या देशातील क्रांती दूर गेली आहे. सारे डावे समूह वेगवेगळया वाटेने चालले आहेत. अर्जुन ह्या संदर्भात म्हणतोय :

**एकाच गावाला जायला निघालेले हे वाटसरू**
**वेगवेगळया वाटेनेच गेले आहेत दूर दूर**

ह्या प्रचलित समाज व्यवस्थेमुळे क्रांतिकारक समूह येथे जन्माला येऊ शकला नाही याचीही खंत कवीला वाटते आहे.

अर्जुन हा दलित पँथरचा एक कार्यकर्ता. पँथर स्थापण्यात त्याचा प्रमुख हिस्सा. ह्या चळवळीचे सर्व चढउतार त्याच्या कवितेने पाहिले आहेत. चळवळ जेव्हां शिगेला होती तेव्हां ही कविता म्हणजे तळपती तलवार होती. चळवळीच्या घसरणीतून खंत, अगतिकता, सौदेबाजीच्या राजकारणाला बळी पडलेले जवळचे साथी, त्यामुळे मनाचा झालेला कोंडमारा याचे मनस्वी दर्शन त्याच्या कवितांमधून होते. अर्जुनची कविता म्हणजे दलित पँथरच्या चळवळीचा चढता उतरता आलेख. अर्जुन एका कवितेत म्हणतोय :

**गांडूच्या दिंडीत टाळ पिटीत फिरताना**
**जांघांच्या जंगलात बेभानपणे हरवताना**
**थैलीशहांचे इमानदार हुजरे होताना**
**इम्पोर्टेड कडब्यावर पोसले जाताना**
**दोस्तानो, आपण आपल्या संदर्भांशी घट्ट बांधले जायला हवे**
**(कडब्याच्या लालचीने काही पळालेले त्यांचे असो )**

किंवा डोक्याला कफन बांधून रस्त्यात उतरणारे जेव्हां जनतेशी वेईमान होतात तेंव्हा अर्जुन उपहासाने त्यांच्याकडे पाहून म्हणतोय :

**ते तर फिरत आहेत म्हणे कॉमन मासेस मधून**
**डोकीवर बांधलेल्या कफनाचे घोळदार सदरे शिवून**
**कधी गळयात पडलेल्या हारांचा तर कधी टाळयांचा हिशेब करीत**

पँथरच्या चळवळीमुळे फार मोठया संख्येने कविता लिहीली गेली. ह्यातील बरीचशी कविता भडक आणि प्रचारी अथवा शिवराळ झाली. याचे कारण सांगता येईल की पँथरचे काही तरुण पुढारी ज्या आक्रमक पोजमध्ये स्टेजवर आपले भाषण करीत असत त्याची सही सही नक्कल त्यांनी उचलली. चळवळीला आलेल्या मधल्या काळातील दैदिप्यमान यशामुळे

सर्वच कविता रोमँटिक क्रांतिवादाच्या आहारी गेली. आपले भारतीय मन, येथली सामाजिक, भौगोलिक परिस्थिती याचे भान कवींना राहीले नाही. ज्या देशात खऱ्या अर्थाने क्रांतिकारक समूह नाहीत तेथें 'बंदूकीचे चाप पुन्हा एकदा चाचपून पाहू द्या' किंवा 'म्यानातील तलवारी बाहेर काढू द्या' किंवा 'सोडा सोडा मला या काळया कुत्र्यांना फाडून खाऊ द्या'' अशा हास्यास्पद रचना लिहिल्या गेल्या. आपला शत्रू म्हणजे कोणती व्यक्ती अगर समाजगट नाही तर येथील परंपरागत विचारप्रणाली, धर्मग्रंथ, जुन्या रूढी, देव-देवळे, जातीव्यवस्था. ह्या विरुद्ध लढायचे असेल तर ही लढाई विचाराच्या पातळीवर होऊ शकते याचे भान अर्जुनच्या कवितेला आहे. एखादा माथेफिरू क्रांतिकारक देशात क्रांति करायची म्हणून जंगल कुठे आहे असा भाबडा प्रश्न जसा करतो त्या पद्धतीची कविता अर्जुनने केव्हांच लिहीली नाही हे वेगळेपण सांगता येईल.

दलित कवितेत एकच सामाजिक सूर आढळतो, कवितेत तोचतोचपणा जाणवतो, तिला भाषणाचा, घोषणेचा तोंडवळा आहे असे दलित कवितेच्या बाबतीत सातत्याने बोलले जाते. ह्या संग्रहातील कविताही ह्या आरोपातून सुटणार नाहीत. भारतीय समाजव्यव्यस्था, तिचे जातीयतेचे स्वरुप, त्यामुळे माणसांची गुदमरलेली अवस्था. तेव्हां ह्याच तोचतोचपणावर कुणी आरोप घेत नाहीत. दलित कवितेचे हे वेगळेपण ह्या देशाच्या परिस्थितितच आहे. याशिवाय आजवर लिहीली गेलेली मराठी कविता. प्रेम, निसर्ग, मृत्यु अथवा मैथुन ह्याच परिघात ती सातत्याने फिरत आहे. हा मात्र तोचतोचपणा वाटत नाही. अगदी वाल्मिकी पासून 'सत्य-शिव-सुंदर' ह्या शाश्वत मूल्यांच्या नावाखाली जे साहित्य निर्माण झाले त्यात दलित साहित्य बसत नाही म्हणून गहजब केला जातोय. परंपरागत सत्याची ढापणे डोळयावर ओढणारे लोकच साहित्यात नव्या जाणिवा रुजू देत नाहीत. ह्या जाणिवा कधी कलामूल्यांच्या नावाखाली, कधी धर्म संकल्पनांच्या नावाखाली, कधी भांडवलदार वर्गाच्या अर्थव्यवस्थेच्या नावाखाली दडपल्या जातात. मृत्यु, मैथुन आणि पाप-पुण्याचे भय येवढयाच मनुष्याच्या मूलभूत प्रेरणा आहेत काय ? ह्यावर लिहीले जाणारे तेवढेच चिरंतन वाङ्मय अशी बुळबुळीत व्याख्या केली जाते. ज्या जमीनीच्या तुकडयावर हे कवी उभे होते, त्या जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन, भूतकाळाशी त्यांचा असलेला संबंध, त्यांची मानसिकता, त्यामुळे भोवतालच्या दुःखाचा त्यांना गवसलेला अर्थ आणि दलित कवींचा दृष्टीकोन ह्यात

कमालीची भिन्नता आहे. समाजातील दारुण दुःखे, त्याची जडण घडण गुंतागुंतीची वीण, सांस्कृतिक मूल्यकल्पना ह्यातच ह्या दोन पातळीवरील लेखक समूहात भिन्नता आहे. विसाव्या शतकामुळे त्यांना ज्या शोषणाच्या विरुद्ध नव्या जाणीवा मिळाल्यामुळेच त्यांची कविता ही परंपरागत मराठी कवितेपेक्षा रचना आणि विचार ह्या पेक्षा भिन्न ठरते. आहे. परंपरागत सौंदर्यशास्त्राच्या कसोटीवर आपली कविता त्याला बेतात येत नाही याची भीती हा कवी बाळगताना दिसत नाही.

दलित साहित्य हे मार्क्सवादी की आंबेडकरवादी हा केवळ शद्बच्छल करणारा प्रश्न पुन्हा अर्जुनच्या कवितेच्या संदर्भातही विचारला जाईल. अर्जुनने आपल्या कवितेतून 'दलित' ह्या शद्बाचे जे व्यापकत्व ध्यानी घेतले आहे, त्याच्या कवितेतले जे प्रतिमाविश्व आहे, उदा. माझे गाणे प्रचंड मोर्च्याने दिलेल्या घोषणे सारखे, मी संपकरी ते संपात कामावर जाणारे किंवा दिव्यांची रांग कळकट मळकट रेशनींगच्या रांगेसारखी इ. मुळे मार्क्सवादी असा शिक्का बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. साहित्याच्या संदर्भात केवळ कलावादी आणि दुसरा सामाजिक दायित्व मानणारा लेखक असे दोन प्रवाह नक्कीच पडू शकतात. पण सामाजिक प्रश्नावर लिहिलेली कोणतीही कविता किंवा कथा मार्क्सवादी किंवा आंबेडकरवादी अशी जाणीवेच्या संदर्भात होऊ शकत नाही. कोणतीही कलाकृती लिहिताना नेणिवेच्या पातळीवर जी सृजनात्मक प्रक्रिया होत असते, ह्या रसायनात तत्वज्ञानाचा, लहानपणापासूनच्या संस्काराचा नकळत परिणाम होत असतो. कलावंत जेव्हां इझम पुढे ठेऊन रचना करू लागतो तेव्हां सदर रचना निश्चित ठोकळेबाज होते. दलित कविता तशी होत नाही. लहानपणापासून चळवळीचे नव्या मूल्यविचारांचे जे संस्कार कवीवर होत असतात. त्या जाणीवांची त्याच्या रक्तात घुसळण होत असते. ह्या घुसळणीतूनच त्याची कविता जन्माला येते. ह्या अर्थाने आम्ही ही कविता आंबेडकरी तत्वज्ञानाचे संस्कार घेऊन बाहेर पडली असे म्हणतो. पण ह्या जाणीवा मार्क्सच्या विरोधात उभ्या आहेत असे वाटत नाही. पुरेसा मार्क्सवाद रक्तात न भिनल्यामुळेच पुरोगामी कविता, नारायण सुर्वेसारख्या तळच्या जीवनाचा अनुभव घेतलेला कवी सोडला तर बाकीची कविता, ही मार्क्स-वादी थोडी पण पांढरपेशी जादा असे घडते. पँथरची फूट पाडताना जी घाणेरडी मनोवृत्ती काम करीत होती तीच मनोवृत्ती आजही दलित लेखकांचे विभाजन करण्यास टपून बसलेली आहे असे खुशाल समजावे.

अर्जुनच्या कवितेबद्दल आमचे एक कलावादी प्राध्यापक मित्र म्हणतात, 'अर्जुनच्या कवितेत कविता थोडी पण लॉजिक जादा असते'. आजवर हळूवार अंतरंगाची संज्ञाप्रवाहातील कविता वाचणाऱ्या ह्या मित्राला अर्जुनची कविता ही कविताच नाही असे वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यापिठीय पातळीवर जो कवितेचा विचार होतोय त्या पलिकडे त्यांचा कवितेचा विचार गेलेला दिसत नाही. मी जेंव्हा पाब्लो नेरुदा किंवा निग्रो कवींच्या कविता वाचू लागतो, त्या कवितांची रचना, मांडणी आणि तिचा आशय हे जेंव्हां बघू लागतो तेव्हां दलित कवितेचा तोंडवळा आणि ह्या थोर कवींच्या कवितेचा तोंडवळा ह्यात कमालीचे साम्य जाणवू लागते. आणि मग वाटू लागते अर्जुन तसा काही फारसा चुकत नाही. नाहीतरी अर्जुनच्या भाषेत सांगायचे ठरले तर

**नसेल सापडत त्यांना माझ्या गाण्यात**
**त्यांच्याच भाषेत सांगायचे तर**
**गोळीबंद अनुभवाचा कलात्मक आविष्कार**

**- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -**

**आपण आपले गाणे गात राहणार**
**त्यांचे काय ते जगत असतात**
**साहित्याचा इतिहास घडविण्यासाठी**
**आपण जगतो आहोत**
**युगाचा इतिहास घडविण्यासाठी.**

मला वाटते अर्जुनच्या कवितेचे सामर्थ्य हे याच शद्बांत आहे.

गोरेगांव, मुंबई.

**दया पवार**

# अनुक्रम


दान १

मी : एक विश्वस्त २

कविता ३

खंत ५

पाऊल कुठे ठेवू ? ६

आज मी उभा आहे ७

युगधर्म ९

हात ११

मी निघालोय् १२

फक्त तिनेच यावे १३

अजून सूर्य उगवायचा आहे १४

तो १५

मी त्याचा होईल १७

एकेक गोष्ट : अर्थात माणसांची : विचार करण्यासारखी १९

पांढरपेशातील मेलेली एक पेशी — लाल पेशी २२

वास्तव २३

आणि बघता बघता २४

पांगुळगाडा २५

कोडे २६

स्वप्नहीन २७

क्रांती २९

बलुतेदार ३०

तोडला गेलेला तू ३२

कुणी सांगावे ३४

एकाच गावाला ३५

हे मनाचे कोरडे एकलेपण— ३६

मी निराश नाही रे ! ३७

किती दिवस ३८

माफ करा ३९

संदर्भासाठी ४०

गर्भार शांततेत ४२

छावणी हलते आहे ४३

युगाच्या इतिहासासाठी ४४

अंकल हो ४५

शेवाळ ४७

पोर्टर ४८

"There are no fools today
to crowd, open-mouthed, round, a 'maestro'
and await his pronouncement. . . .
give us new form of art—
an art
that will pull the republic out of the
mud."

— mayakovsky

# दान

इथली प्रत्येक रात्र किलावेनमानीच्या रात्री सारखी.
कत्तलखोरांशी संधान बांधून असलेली.
खरा म्हणजे हवाय इथे
सहस्त्र डोळ्यांचा सशस्त्र पहारा.
–कसे जागवावे त्यांना-त्यांच्यातील हिप्नोटाइज्ड मनांना
घशाला किती कोरड पडत चाललीय.
घोटभर पाणी देणाऱ्या हातांची दानत देखिल बिघडत चाललीय.
–किती काळ सोसायचा हा निद्रानाशाचा विकार
घ्यायचे का परत आपण दिलेले सर्व नकार
ठोकायचे का इथल्या क्षणांना सलाम
पोलिस अधिकारी स्मग्लर्संना ठोकतात तसे.
मानसिक नपुंसकत्वाकडे नेणारे असले किती एक विचार
छे ! आपण त्यांच्यासारखेच कसे जगायचे
आपल्याशीच आपण बेईमान कसे व्हायचे
अन् रणाला दान केलेले हात परत कसे घ्यायचे.

## मी: एक विश्वस्त

आभाळा एवढ्या दोन डोळ्यांनी
जिंदगीभर अश्रू ढाळावेत
किंवा…
कोटी कोटी चैतन्यमय हातांनी
संघर्षशील होऊन अविरत जंग करावे
असे हे इथले दुःख – दैन्य,
पण दिसते आहे केवळ मला
सर्वत्र पसरलेले लाचार भित्रे औदासिन्य.

कां अजून भेटले नाही इथल्या जीवांना
मन ओतणारे समर्थ शिल्पकार ?
अन् जर भेटलेच असतील तर…
कां चढली नाही त्यांच्या हत्यारांना धार ?
असे किती एक प्रश्न – मेंदूला टोच मारणारे…
काळोखाच्या गुहेत ढकलत नेणारे.

अस्ताव्यस्त भयाण काळोखातला
मी एक उध्वस्त
रडण्याची अन् लढण्याची शक्ति हरवलेला
मी एक अस्वस्थ,
त्यांच्या सारखाच होतो इथल्या दुःखाचा
मी एक विश्वस्त.

फलाटावर सांडलेला दुष्काळग्रस्तांचा प्रचंड तांडा
गावकुसा बाहेरील आपला चेहरा दाखविणारा
कसे दाखवून देऊ मी त्यांना
त्यांच्यातले नि माझे रक्ताचे नाते
कुठे आणि किती फिरवू त्यांच्यासाठी
लोकलसाठी ताटकळणाऱ्या माझ्या शहरी पावलांना
हे चिले पिले जीव. 'सुजलाम् सुफलाम्-वंदे मातरम्'
कसे आणि किती जणांना आपल्या हाताने भरवू.
त्यांना मी कसे आणि काय सांगू

मी फक्त आता सांगतोय त्यांना
'इंडिया दॅट इज भारत' म्हणणाऱ्या
मध्ययुगीन महाभागांना
मी फक्त आता सांगतोय त्यांना
एक बोट आभाळाकडे दाखविणाऱ्या
अन् दुसरे तुपात बुडवून ठेवणाऱ्या
राजगादी सांभाळणाऱ्या सामंतशहांना
मी फक्त आता सांगतोय त्यांना
पाण्याचा ओघ आपल्या दाराकडे वळवून
साखरेत लोळणाऱ्या मदमस्तांना
बाबांनो: उरात दाटलेले असंख्य बॉम्बस
फुटून निघतील वेळी - अवेळी तुमच्या भेटीसाठी
कुठची गंगामैया उरणार नाही तुमच्या राखेसाठी
बाबांनो, मायबाप हो, उरात दाटलेले असंख्य बॉम्बस्
फुटून निघतील वेळी - अवेळी तुमच्या भेटी साठी
थेंबभर पाण्यासाठी - कोरभर तुकड्यासाठी
वणवण फिरणारांना भूमी मिळवून देण्यासाठी.

फलाटावर सांडलेला दुष्काळग्रस्तांचा प्रचंड तांडा
माझ्या उरात किती बॉम्बस् पेरून ठेवणार
अन् असाच बघत मी किती वेळ थांबणार.

# खंत

त्यांचे गाणे : लचकणारे
भरजारी शामियान्यात दिलेल्या अध्यात्मवाल्याच्या प्रवचनासारखे

माझे गाणे : सरळ भिडणारे
प्रचंड मोर्चाने दिलेल्या घोषणा सारखे
त्यांचे रस्ते: परिकथेतले—पंख असलेले
डोळे झाकले की इच्छितस्थळी पोहचविणारे
माझे रस्ते: चक्क रस्त्यासारखे
दगड धोंड्यांचे मातीशी जखडलेले.

मी संपकरी
ते संपात कामावर जाणारे
मी मशालजी
ते अगरबत्ती लावून गादीवर लोळणारे
मी सालकरी
ते घरात कोठारे उंचावत नेणारे.

ते आणि मी – मी आणि ते
दोघात एक प्रचंड भिंत
मी आल्याड ते पल्याड
भिंत कधी उलथणार हीच खंत.

# पाऊल कुठे ठेवू ?

पाण्याने व्यापलेला प्रचंड आसमंत
दिशासुद्धा विरघळून गेल्यायत्
मी उभा आहे मार्ग शोधित
सभोवती पसरले आहेत लहान मोठे दगड
कुठच्या दगडावर पाऊल ठेवू ?
सगळेच दगड भासताहेत मला कासवे
माझ्या भिरभिरल्या डोळयात रहातात उभी आसवे
पाऊल कुठे ठेवू मी ? पाऊल.........

कळता कळत नाही मला
फक्त चोवीस गारठ्यातच कां गेलाय थिजून
ठरवलेयना मी, हा आसमंत जायचा ओलांडून
ते पहा, सुरू झालेयत्, ऐकू यायला लागलेयत्
दूरवर कुठून तरी परिचित
ते दिव्य मंगल गळा भरुन घोष
थिजलेल्या माझ्या देहात कसा येतो मग जोश
होय तिकडेच जायचे आहे ना मला
पण.................
पाऊल कुठे ठेवू ? पाऊल.........

# आज मी उभा आहे

हा चिऊचा हा काऊचा हा माऊचा
म्हणून घास भरविला नाही कुणी मला
निंबोणीच्या झाडामागे लपलेला चांदोमामाही
दाखविला नाही कुणी मला
शाळेला जाताना कुणी फिरविला नाही
माझ्या चेहऱ्यावर काजळ - पावडरचा हात
मुरंबा - पोळीने भरलेला डबा ठेवला नाही दफ्तरात
रस्त्यावर भाजलेले माझे अनवाणी चिटुकले पाय
कोण होते गोंजारायला आणून डोळ्यात मायेची साय
लेबर कॅम्पच्या घेट्टोत आपला देह कसा वाढत गेला
खरोखर अजूनही कळत नाही मला

यंत्राशी झुंज घेतलेला माझा पोलादी बाप
थकलेला भागलेला कागदी देहाचा होऊन येई
पाटावर डोके ठेऊन पाय पऱ्याला लावून
घरांच्या कौलाकडे पाहत चारमिनारचे झुरके घेई
अंधाराची चाहूल लागताच बाप खडबडून उठे

‘अभ्यास करा बाबासाहेबासारखे व्हा आमच्यागत सडू नका’
बाप आमच्याकडे न बघता दाराकडे बघत डाफरत राही
घासलेटच्या ढणढणत्या बत्तीत आम्हा भावंडांचा अभ्यास सुरू होई
रणरणत्या उन्हाच्या छाताडावर पाय ठेवून धारावीच्या कचरापट्टीत
गळ्यात गोणपाट अडकवून लोखंड – कांच – लाकडे वेचणारी आई
पोट जाळण्यासाठी लोखंड – कांच ‘अब्दुल भंगारवाल्याला’ विकी
अन् चुलीला जाळण्यासाठी लाकडे घरी घेऊन येई
चुलीतली लाकडे फुंकत आई आमचा अभ्यास बघत राही
धूर नसताना देखिल उगाचच तिच्या डोळ्यात पाणी वाही
भाकरी थापण्याच्या आवाजाने पुस्तकातील अक्षरे उडू लागत
तिच्या खरपूस वासाने आमची आतडी तुटू लागत.

अभ्यास करताना आमच्यावर असलेली बापाची ताठ नजर
भाकरी सारखी मऊसूत उबदार होत असे
‘उठा रे, जेवून घ्या सकाळी लवकर उठा’ बाप पुन्हा गरजे
जर्मनच्या पिचलेल्या ताटांना पुन्हा एकदा बाळसे येई.

–तर सहज हाती लागलेले पाठ्य पुस्तक ‘बाल भारती’ वाचून
त्यातील देवाची गोंडस लेकरे बघून गेलो चक्रावून
आपण फक्त हसलो, बालपण आठवत गेले सारे
भूतकाळ खोदताना लागतात असे हे खारट झरे.

आज मी उभा आहे माझ्या समर्थ हातात कुंचला घेऊन
अशाही भाऊगर्दीत माझ्या वेदनांचे विश्व रंगविण्यासाठी
मी कुठेही असेन, तोडू शकत नाही त्याच्याशी नाळ
माझ्या स्वागतासाठी सिद्ध आहे प्रकाशमान् भविष्यकाळ.

## युगधर्म

काळा डगला अंगावर चढवलेला
हातात सर्टिफिकेट घेतलेला
अडकवला जेव्हा माझा मी फोटो
पापुद्रे पडलेल्या भिंतीच्या खिळ्याला
कर्जबाजारी बाप माझा मनोमन मोहरला
त्याच्या कोरड्याठाक डोळ्यांत किरण चमकला
धाकट्या भावंडाना जवळ ओढून घेत
जुनेरातली माय माझी आनंदवेडी झाली
आणखी किती एक मंडळी कौतुक करून गेली.

दिवस येत होते, दिवस जात होते. दिवस येणार होते
पेपरातल्या जाहिरातीचे 'पाहिजेत' चे
कितीतरी कपटे जवळ साठत होते
केलेल्या अर्जाला का कोण जाणे उत्तर येत नव्हते.
एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या भोवती जमणाऱ्या
बेकारांच्या थव्यात मी मिसळत होतो.
अन् आपसांत दु:ख वाटून घेत होतो.
हरेक कंपनीच्या फाटकाशी मैत्री झालीच होती.
जगावर थुंकण्यासाठी ओठावर आलेली थुंकी
दु:ख म्हणून गिळली जात होती.

जगत आहोत आम्ही इथे; जगावे लागते म्हणून
तर असे हे जिणे जगत असताना
ही महानगरी आमच्यावर आणखी खूष झाली
‘ बेकार ’ नावाची तिची प्रियतम पदवी आम्हा बहाल केली
लढावे म्हणतो मन रणांगण करून
ते तर मुळी जमतच नाही
हळहळतो जीव, चडफडतो भुकेला आत्मा
ह्या पिढीच्या नावाने
कळता कळत नाही
कां बदलत नाही आम्ही हे दुबळे जिणे
उघड्या डोळ्यानी आम्ही हे पाहत आहोत
युगधर्म तुडवून खुश्शाल आम्ही उभे आहोत
एक मात्र निश्चित…
पाळला नाही जर हा युगधर्म
बसले आहेत भावी इतिहासकार लेखण्या सरसावून लिहिण्यास…
“ इथे एक षंढाची पिढी होऊन गेली ” म्हणून.

# हात

गावकुसाबाहेरील निश्चल वस्तीत
तू येऊन गरजलास
सारी वस्ती खडबडली
धूळ झटकीत सावध झाली
तू पुढे निघालास
तुझ्या हाती होता धगधगता हिलाल
हादरून गेले होते सगळे काळोखाचे दलाल
तू आणखी पुढे गेलास
सारी वस्ती तुझ्या मागोमाग येत होती
तू थांबलास
तळ्या जवळ
साऱ्या वस्तीला तू जीवन दिलेस
आणखी दिलेस. भरून दिलेस.
अन् तुझे समर्थ हात अचानक लुप्त झाले
ज्या हातावर सोपवून गेला होतास तळे
ते सगळेच हात थोटे निघाले
जीवन देण्यास असमर्थ ठरले
सारी वस्ती पहात आहे मुकाटपणे
उभी आहे ऊन-पावसाचा मारा खात
शोधित आहे तुझे ते समर्थ हात.

# मी निघालोय्

त्या वाटेने तू मुळीच जाऊ नको ते सांगतात
तिकडे गेलेला परत येत नाही ते म्हणतात
निरनिराळे दाखले देऊन ते भीती दाखवतात
'विचार कर' म्हणून पुन्हापुन्हा बजावतात.

इथली एकही वाट माझी म्हणून मला वाटत नाही
माझ्या पावलांना वेग घ्यायला मुळी सुचत नाही
हे त्यांना सांगूनही विचारत असतात काही बाही
जुनाट चष्म्यातून चाळत राहतात जुनीच वही.

माहितेय संपणार नाही यांचे हे वैचारिक मैथुन
त्यांच्या तोंडी लागून मी जगावे कां पंगू होऊन
मी निघालोय् माझ्या वाटेने ठार बहिरा होऊन
वाजत गाजत येईन याच वाटेने प्रकाश घेऊन.

# फक्त तिनेच यावे

गमावून बसतो आहे व्याजापायी सगळे सुखद क्षण
भूतकाळाकडे गहाण पडलेल्या माझ्या मनासाठी
हसणे-रडणे तर केव्हाच संपलेले आहे
निर्विकारपणे चाचपत बसतो वेदनांच्या गाठी

येतात कधी-कधी तिच्या आठवणी नातेवाईकासारख्या
कधी गप्पा मारायला तर कधी आश्वासन द्यायला
बोल बोल बोलतात. कंटाळतात निघून जातात
निरोप देणे सुद्धा सुचत नाही माझ्या मुक्या ठार हृदयाला

मलाही कळते हो, संपायला हवे हे रखरखीत एकलेपण
...फक्त तिनेच यावे... तिचा सारा सारा ऐवज घेऊन
भूतकाळाकडे गहाण पडलेले माझे कोरीव मन
तिनेच सोडवावे, तिच्याच हाताने, उदार होऊन.

# अजून सूर्य उगवायचा आहे

ऊठा तुमच्या जगावर सूर्य उगवला आहे
त्यांना कोणी जागे केले
आणि ते डोळे चोळीत उठले
पाहू लागले उगवता सूर्य
ते आश्चर्यचकित झाले.
त्यांना दिसत होता फक्त अंधार
पूर्वी इतकाच भयानक.
त्यांना वाटले: कदाचित उगवत असेल
वाट पाहिली, एक दिवस, दोन दिवस……
तब्बल वीस वर्षे.
त्यांच्यासाठी सूर्य उगवलाच नव्हता
उगवला होता पण तो……
कांहिनी विकत घेतला होता.
अलिशान प्रासादात कोंडून ठेवला होता
अजून त्यांचा सूर्य उगवायचा आहे
गुलाल उधळीत तो यावयाचा आहे.

# तो

तो
गावकुसाबाहेर कुठेतरी असायचा
इतरांना घर असते
याला फक्त अंगण असायचे
त्यावरच तो झोपी जायचा
वास्तविक तो एक सागरच होता
डोक्यावर दिवसा सूर्य घ्यायचा
अन् रात्री चंद्र असायचा
गत्‌कालच्या गोष्टी आठवता
तो सणाणून उफाळून यायचा
वर्तमानाच्या धाकाने तितकाच मागे हटायचा.

अडली-सडली सटर फटर कामे करीत
गावभर तो वणवण हिंडायचा
शिळे-पाके, उष्टे खरकटे पोटात ढकलून
वाढलेले पाणी घटाघट पिऊन तो परतायचा
ठरलेल्या जागी येऊन तो पसरायचा
निघालेच अचानक कुणाचे काम तर
कधी शिव्यांनी, कधी लाथांनी जागा व्हायचा.

तो ज्या ठिकाणी झोपलेला असायचा
तिथेच असायचा वर शेंदरानी बरबटलेला
पण आतून काळा असलेला दगडाचा देव
त्याची तो रोज न चुकता सेवा करायचा
रानातली फुले तोडून तो मनोभावे अर्पायचा.
त्याचे काही दुखले खुपले तर
अंगावर मारून मुटकून न्यायचा
कधी तहानेने व्याकुळलाच तर
दाताचे पाणी गिळीत तो बसायचा.

खरं म्हणजे तो आभाळातून पडला होता
धरणीने झेलला होता – वाढीवाची लागला होता.
एक दिवस मोठे आक्रित घडले
झपाटलेला एक फकिर येऊन गेला
कानात त्याच्या मंत्र सांगून गेला
तो उठला, फुरफुरला, पुन्हा पुन्हा गरजला,
त्याच्या हातातला हिलाल धगधगला
अग्नीने व्यापून टाकले सारे तळे
सारा गांव उठला चोळीत खुनशी डोळे
त्याचा हिलाल अधिकच धगधगला
मग तो आला त्या शेंदराच्या देवा जवळ
जबरदस्त ठोकरेसरशी त्याला दिला उडवून
त्याच्या खाली लपलेली गांडुळे गेली भोवंडून.

...आता त्यानी त्याच्या अंगणासाठी
छोटेसे का होईना नवीन घर बांधले आहे.
चटणी-मिरची का होईना घरात शिजवून खात आहे.
...मात्र त्याच्या हातातला हिलाल अजून धगधगतो आहे.

# मी त्याचा होईल

हस्तमैथुन करण्याच्या वयात
दोरखंडे वळायला लागावीत
'चाँदसा मुखड्याशी' रमून जाणाऱ्या वयात
शहर पालथे घालून तळवे झिजवावेत
अंगाखांद्यावर नातवं खेळविणाऱ्या वयात
रोगालाच अंगाखांद्यावर खेळवीत बसवावे
हेच का जगणं माझं ?
गावकुसाबाहेर माझेच रक्त सडले जात आहे
इथे मी झोपडपट्टीत
त्यांचीच एक शहरी आवृत्ती.

कुणाला सांगू मी हे
इथल्या मातीला ?
जिने माझ्या अस्तित्वाचे पाऊल अजूनही उमटवून घेतले नाही तिला !
इथल्या चंद्राला-सूर्याला !
माझ्या वस्तीवर पडणाऱ्या किरणांना खेचून घेतात त्यांना ?
कुणाला...... कुणाला...... सांगू.
अठ्ठावन्न कोटीची गर्दी असलेल्या या भू-प्रदेशात
मला असेच जगावे लागणार
ह्या गर्दीत कोण कुणाच्या व्यथा ऐकणार
मला हवेय जगणे
ज्यात स्वत्व असेल
मला हवीय माती
जी भाळी लागताच डोळ्यात आले पाहिजेत ओघळ
मला हवेत चंद्र-सूर्य
जे किरणाचे दोर टाकून जवळ ओढून कुरवाळतील
मला नकोय् नुस्तीच गर्दी-नुस्ताच भू-भाग
मला हवय् त्याच्या साठी अर्थपूर्ण नाव
जे माझ्या हृदयावर कोरले जाईल
जे माझ्या असीम वेदनांवर फुंकर घालील
ते माझे होईल मी त्याचा होईल

## एकेक गोष्ट : अर्थात माणसांची : विचार करण्यासारखी.

सकाळी उठलो
बाहेर पडलो
समोर भिकारी दिसला
त्याला सलाम ठोकला
फक्त एकच पैसा हातात टेकवला
हसला. खूष झाला. मी ही खूष

पुढे निघालो
महारोगी भेटला
त्याला आलिंगन दिले
त्याचा मुका घेतला
ऐकेक त्याची जखम कुरवाळली
हातात त्याच्या पावली टेकवली
त्याने ती नाकारली
डोळ्यात त्याच्या आनंदाश्रू दाटले
अन् माझ्याही

मग हिजडा भेटला
गळ्यात गळा घातला
जानी दोस्तागत माझ्या सोबत भटकला
मग दोघांनी चहा घेतला
तृप्त झाला हस हस हसला
ऊर त्याचा दाटला
त्याचा निरोप घेतला

मग आलो सुशिक्षित सुसंस्कृत माणसांच्या कळपात.
दिसला पहिला नातेवाईक.
मोठा तऱ्हेवाईक. नमस्कार मी घातला.
न बघताच पुढे सटकला.
राग आला. म्हटलं, गेला उडत.
चालू लागलो धडपडत.

मग भेटला एक शेजारी.
वाटला जरा तो विचारी.
मी हसलो तो ही हसला.
मी विचारले 'कुठे निघालात राव!'
त्याने उत्तर दिले,
'कापड आणायला निघालोय् बाजारी.'
मग त्याने माझ्या शर्टाकडे पाहिले.
अन् पुटपुटला.
'हलक्यातला दिसतोय् जरा.'
अन् निघून गेला तरातरा.
मला आली त्याची शिसारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2392 का०२४
29668
(स्थळ प्रत)

चालू लागलो दुखऱ्या मनाने.
समोर दिसली माझी प्रेयसी.
बरे वाटले.
वाटली हवी हवीशी.
तिने विचारले ' कुठे निघालास ? '
म्हटलं 'तुझ्याकडेच.'
ती म्हटली, 'बरं झालं चल.'
मीही शोधत होते कुणीतरी हॉटेलात जायला.
मला राग आला म्हटलं,
' मूड नाही नंतर भेट '

मग मी खूपखूप हसलो.
शोधू लागलो अवतीभोवती
भिकारी...... हिजडा...... महारोगी.

पांढर पेशातील मेलेली एक पेशी— लाल पेशी.

ये, बस ना अशी इथे, मऊ वाळूत हवा खाऊ
भेळ ना ! भेळीचं मग नंतर पाहू
तो बघ तिकडे सूर्य कसा दिसतो लाल
जसा टोमॅटो बाजारात पाहिलेला काल

पण तू अशी का उदास उदास
तुला मी एक गोष्ट सांगतो झकास
काल साहेब खूष कोण जाणे काय वाटलं
पाच रुपयाचं इन्क्रीमेंट मला देऊन टाकल

ते बघ एकदम आत दूरवर होडीत कोळी
रात्र होतेय् काळी टाकलीत पोटासाठी जाळी
खरच; नोत्शे म्हणतो तेच खरं ‘ लिव्ह डेंजरसली ’
परवाच आम्ही पगारवाढी जोरदार निदर्शनं केली

अजून गप्पच, जातील हे दिवस, राहतीलच कसे म्हणू
फक्त पेटला पाहिजे प्रत्येक जिव जिवाणू अणूरेणू
अन्याय, अत्याचार, जुलूम साहून पाहून
वाटत लढावं, बलिदान करावं, गोळी खावून

राहू दे, बस. का अजून अशी तू खिन्न
तू अशी वागतेस मग मन होत विषण्ण.
उद्याचं ना ! घाई नाही. संप आहे पगार वाढीसाठी
बावरू नकोस. आधीच रजा घेतली आहे उद्यासाठी

## वास्तव

वास्तवाच्या उघड्या नागड्या रस्त्यांतून चालतांना...
भावनेचा रूमाल मी घरींच ठेवून निघतों
साळसूदपणें डोक्यावर चढवून व्यवहाराची टोपी
दिसेल त्याला वांक वांकून सलाम ठोकतो.

हें अस्थि-मांसी शरीर असेच जगवावें लागतें
स्वत:च जाळलेल्या स्वत:च्या आत्म्याची ऊब देवून
टनाटनाचें एक अदृश्य ओझें घेवून डोक्यावर
संपवायचा असतो इथला रस्ता स्वत: संपून.

नाहींतरी काय, हे आयुष्य कुणालाही मिळतें
रस्त्यांत वाटल्या जाणाऱ्या जाहिराती सारखें
तत्व, ध्येय, प्रामाणिकपणा इत्यादि बाळगून उराशीं
आयुष्य महाग करून कां व्हावें सुखाला पारखें.

## आणि बघता बघता

…आणि बघता बघता
त्यांचे कुळिथ देखिल विकले गेले
आपले गहू मात्र तसेच राहीले
भरल्या बाजारातून अनवाणी मनाने परतताना
भळभळल्या जखमांना आपणच समजावले

आता हा चार भिंतींचा ओलावा
ठणकल्या जखमांना कदाचित थंडावा देणारा
आपल्या उमद्या श्वासांना कदाचित कुबट करणारा
उद्याच्या आपल्या निश्चित दळभद्री मरणाची रंगीत तालीम घेणारा

आपण, मरण, भिंत. ओलावा, आपण.
किती शिस्तबद्ध आपण गरगरतोय्
समोरचा बुद्ध किती मोठ्याने हसतोय्.

# पांगुळगाडा

…आणि तुझ्या आठवणी येऊन थडकतात
सैनिकाचे कपडे पोष्टाने परत यावेत तशा
मग मन पेटून उठतं, धडका देत सुटतं
पोलिसांची साखळी तोडणाऱ्या सत्याग्रही सारखे
भूतकाळाच्या अश्रूधूरात झोडपतो
तुझ्या शब्दांचा, शपथांचा, सहवासांचा लाठीमार
लोळा गोळा होऊन पडते रस्त्यावर
मग खरंच अगदी खरं
पांगुळलेल्या माझ्या मनासाठी
तुझ्याच आठवणी येतात
पांगुळगाडा होऊन

# कोडे

सारेच कसे उदास भकास
दिव्यांची ती प्रचंड रांग
मलूल खिन्न कळकट मळकट
रेशनींगच्या रांगेसारखी.

रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या
त्या चाळी
प्रेता भोवती उभ्या असलेल्या माणससारख्यां
निश्चल स्तब्ध.

पंचरलेला तो काळोख
कोड फुटलेल्या माणसागत
निस्तेज.

सारेच असते भकास उदास
चैतन्यहीन. अशा वेळी
लूत भरलेला कुणी एक कुत्रा
कां फिरतो हुंगत हुंगत ?

## स्वप्नहीन

शरीरातील हृदय काढून टाकावे तसे
जगण्यातले स्वप्न आता काढून टाकले आहे
स्वप्न तसे साखर झोपेतले नव्हते
केवळ माझेच नव्हते तर
झोपेत देखिल साखरेसाठी रांग लावणाऱ्यांचे
त्यांचे—माझे सर्वांचे होते.

इतिहासातील सोनेरी पाने माझ्या स्वप्नात फडफडत यायची
भविष्याचा दिलासा देत—निरोप घेत घेत
उगवतीच्या लालिम्यात हसतमुखाने विरघळायची

तर स्वप्न मला पडायचे
भुके कंगालच्या जूलूसाने उध्वस्त केलेल्या
बॅस्टालच्या भिंतीचे
आक्टोबर क्रान्तीने केलेल्या चमत्काराचे
मार्च सत्तावीसला महाडला लागलेल्या पाण्याच्या आगीचे
तेलंगणातील लखलखत्या पात्यांचे
चौसष्टच्या विराट भूमिहिन सत्त्याग्रहाचे
आमार सोनार बांगलाचे
व्हिएतनामी जनतेच्या कणखर मनगटांचे
अगदी अलिकडे चौऱ्याहत्तरात पडलेल्या
वरळीच्या ठिणगीचे

आता मी स्वप्नहीन झालो आहे
कारण मी पाहिला आहे
चौरस आहारावर पोसला जाणारा अनौरस क्रान्तीगर्भ
ह्या क्रान्तीगर्भाचे पाय उफरटे असलेले
अन् हाताचे पंजे सरळ आपल्या नरड्याशी भिडलेले
मी हे देखिल पाहिले आहे
ह्या अनौरस गर्भाचे पतन करताना
अन् गर्भ पोसणारे नियमाने गर्भगळीत होताना

तशी गर्भपतन करणाऱ्या हातांची झेप कोठवर आहे
हे मला चांगले माहित आहे
तरी देखिल त्या हातांच्या स्वागतासाठी
चारच ओळी सध्या मी लिहित आहे

जगण्या-मरण्याच्या बिकट प्रश्नातून
आपल्या अस्तित्वाच्या नितांत निकडीतून
प्रकाशाची वाट अडवू पाहणाऱ्यांच्या
अत्यावश्यक निर्दालनाच्या गरजेतून
त्या हाताच्या स्वागताचा
तारतम्यावस्थेतला आपला हिशेबी निर्णय
कदाचित आपल्याला स्वप्नहीन करीत असेल
पण दिशाहीन मात्र निश्चित नाही.

# क्रांती

गळ्यात गाडगे अडकवून
ढुंगणाला खराटे बांधून
जेव्हा आम्ही फिरत होतो
वरल्या आळीच्या दारादारातून
'जोहार मायबापचा' गजर करीत
तेव्हा तिथल्या माणसांचे आम्ही मित्र होतो
अन कावळ्यांना शत्रुवत् होतो
कारण आमच्या थुंकीतला शेंबूड
कधीच त्यांना देत नव्हतो
वरल्या आळीतील मेलेली ढोरे
अंगाखांद्यावर आणून, त्यांना उभे फाडून
आपापसात मासाचे वाटे करून
जेव्हा कातडे व्यवस्थित बाजूला करीत होतो
तेंव्हा त्यांना आम्ही प्यारे होतो
कोल्हे - कुत्री - गिधाडे - घारींना वैरी होतो
त्यांचे भक्ष्य आम्हीच भक्षित होतो
... ... ... ... ... ... ... ....
आज मात्र दिसतो आहे आमूलाग्र बदल
कावळे - कोल्हे - कुत्री - गिधाडे - घारी
आमचे परममित्र झाले आहेत
वरल्या आळीतली दारे शत्रू झाले आहेत
... ... ... ... ... ... ... ... ... ...
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार
जाळा रे जाळा त्यांना करिती जे संस्कृतीवरी प्रहार

# बलुतेदार

लाख नाकारीत असाल
नाकारा
तुमच्या पैकी कित्येक मनांच्या कंगोऱ्यात
अजून आहे दडवलेला
इंचभर तरी ' पुरीचा शंकराचार्य '
येतो उफाळून कधी कधी तो वर
द्वेषाच्या अग्नीने
' दिवाळीतला साप ' जसा व्यक्त होतो विराट रूपात
लहान मुलाने लावलेल्या पेटत्या काडीने
लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला त्याचे काहीच नाही
नाही उठत आता पेटून भुकेला आत्मा
कारण तोही खूब समजून चुकलाय्
नागडे मन तुमच्या जवळ नाहीच नाही.

लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला काहीच बोलायच नाही
आमच्या व्यथांचा जथा
येत आहे खडक ओलांडून–सपाट मैदानावर
ओठात ओवून नकार
डोळ्यात त्याच्या आहे अंगार
येणार आहे, येतो आहे
आमच्या व्यथांचा जथा सपाट मैदानावर
अन् देणार आहे, देणार आहे
टक्कर या संस्कृतीच्या जुनाट बुरूजावर
कदाचित नाही पडणार खिंडार
होईल रक्तबंबाळ, राहील फक्त वेदनाच माथी
सज्जनहो, फिकीर नाही आम्हाला त्याची
जगू शकतो घेऊन हा वेदनांचा भार
कारण आम्ही युगानुयुगाचे दुःखाचे बलुतेदार.

# तोडला गेलेला तू

विमानांची घरघर कुठेच ऐकू येत नाही
बॉम्बगोळ्याची फेक कानाचे पडदे फाडत नाही
कुठलाही विषारी वायू सोडला जात नाही
' इंच इंच लढविण्याची ' भाषाही कुठे ऐकू येत नाही
तरीही तू का असा मारला जातोयस्
शहरातल्या गल्लीगल्लीतून - दारा दारातून
तुझी आय - बहिण कां नागवली जाते तुझ्या डोळ्यादेखत
तुला का तोडले जाते शास्त्रशुद्धरित्या
... ... ... ... ... ...पाण्यापासून
... ... ... ... ... ...अन्नापासून
... ... ... ... ... ...निवाऱ्यापासून
... ... ... ... ... ...जगण्यापासून
... ... ... ... ... ...माणूसपणापासून
शोधला आहेस कां कधी तू याचा ऐतिहासिक कार्यकारणभाव
त्याचा उद्‌गम् - त्याचा विकास - त्याचे तत्वज्ञान
देव - देश - धर्म - जात - वर्ण यांच्या जडशीळ बेड्यात
तू स्वतःला आणखीन किती दिवस अडकवणार
तुझे माणूसपण हिरावून नेणाऱ्या तस्करांना
तू आणखी किती दिवस मोकळे ठेवणार
हे इथले भणंग, महापुरूषाना कंत्राटी पद्धतीने राबविणारे
भावनिक धूळ उडवून तुझा असली चेहरा झाकणारे.

आता मी उधाणलेला पण दिशा सापडलेला
तुला सोबतीला घेऊन निघणार आहे
तुला न समजलेला – न दाखविलेला
नेमका शत्रू दाखविणार आहे.

आता तुझ्या मुर्दाड मनातून ठिणग्या फुलू देत
आता तुझ्या रूख्या सुख्या ओठातून ज्वाळा निघू देत
आता तुझ्या रूतलेल्या पावलांना चाके फुटू देत
आता तुझ्या हातातील बेड्या कडाकड तुटू देत

हे सगळे आपलेच आहे – आपलेच होणार
तुझे – माझे – राबणारांचे – कष्टकऱ्यांचे – श्रमणाऱ्यांचे
धर्म आणि अर्थ यांच्या खाली पिळल्या गेलेल्यांचे
अरे हा चमत्कार नव्हे. शास्त्र आहे. इतिहासाची साक्ष आहे
तोडला गेलेला तू, जोडला जाणार आहेस तू
आता मी उधाणलेला पण दिशा सापडलेला
तुला सोबतीला घेऊन निघणार आहे
तोडला गेलेला तू – जोडला जाणार आहेस तू

## कुणी सांगावे

तसे हे गाव माझे म्हणून मला असे वाटतच नाही
आपला म्हणून वाटावा असा एकही चेहरा इथे दिसत नाही.
तरी असे काही भेटले होते म्हणा जे मला माझे वाटले होते
कारण ते हसले होते दुसऱ्यांना. पाहून फिरवताना थाळी
चाचपून बघताना ऐन मोसमात त्यांना उभे-आडवे
त्यांच्याही काखेत अखेर सापडली अडकवलेली झोळी.

हे संथ एकाकी भटकणे सोबतीसाठी चेहरे न्याहळणे
तिच्या स्वागतासाठी गीताच्या ओळी जुळवीत जाणे.

असतील का ह्या गावात मला हवे असलेले चेहरे ?
असेल का त्यांच्या ओठात माझ्या ओठातले गाणे ?
असो. मी तर ठरवून बसलोय् माझ्या मनाशी
माझे डोळे-माझी पावले गावभर फिरवीत जाणे

कुणी सांगावे हे गाव मी माझे झालेले पाहीन
जमलेच नाही तर भवभूतीचे वचन गात शेवटचा श्वास घेईन.

# एकाच गावाला

एकाच गावाला जायला निघालेले हे वाटसरू
वेगवेगळ्या वाटानीच गेले आहेत दूरदूर
खूप दूर, खूप दूर, त्यांना मी आता कसे पुकारू
कुठचा बर्मनूदा करील का संगीतबद्ध माझी हूरहूर

एकेकट्याला वाटेत गाठून करते बेदम मारहाण
दुःखाच्या दलालांची मस्तवाल मग्रूर टोळी
कुणाचे लाल कुणाचे निळे कुणाचे लाल-पांढरे
पोशाख फाडून शेकत बसते करून होळी

समजून-उमजून त्यांनी आता परतायला हवे
त्याच गावाला जाणारे नवे वाटसरू बरोबर घ्यावे
एकाच घरातील एकाच आईच्या लेकरांसारखे
दुःखाच्या दलालांना निर्भयपणे भिडावे

एकाच गावाला जायला निघालेले हे वाटसरू
वेगवेगळ्या वाटानीच गेले आहेत दूर दूर
समजून उमजून त्यांनी आता परतायला हवे
कुठचा बर्मनूदा करील का संगीतबद्ध माझी हूरहूर.

## हे मनाचे कोरडे एकलेपण —

हे मनाचे कोरडे एकलेपण
दुष्काळात सापडलेल्या गावकुसाबाहेरील वस्ती सारखे
उलटलेले बेईमान गल्लेलठ्ठ क्षण हसतात
दुष्काळग्रस्त निधीवर असलेल्या अधिकाऱ्यासारखे;
'काळेभोर ढग येतील, झिम झिम बरसतील .....
थुई थुई मोर नाचतील – हिरवे हिरवे गार गालीचे ......
ही आशा तर आपण केव्हांच सोडून दिलीय्
म्हणूनच आपल्या सारख्यां सोबत आपण
निघालो होतो झरा शोधायला
अजूनही कळत नाही आपल्यासारखेच असलेले ते का पळाले
कुणी कॅमेऱ्याच्या तर कुणी स्पॉट लाईटच्या दिशेला.

हे मनाचे कोरडे एकलेपण
किती काळ आपण इथे मध्येच थांबणार आहोत
ते तर फिरत आहेत म्हणे कॉमन मासेस मधून
डोकीवर बांधलेल्या कफनांचे घोळदार सदरे शिवून
कधी गळयात पडलेल्या हारांचा तर कधी टाळयांचा हिशेब करीत
त्यांचे असो, त्यांचा विजय असो ..... ते झिंदाबाद, वगैरे ...वगैरे...
आपल्या कफनाचे काय? सदरा ... टोप्या ... लंगोट्या ?
परतायचे का? होय परतायलाच हवे
कफनवाल्यांचा नवा तांडा शोधित फिरावे
सापडलाच तर आपणही मिसळून जावे.
निघण्यापूर्वी मात्र एक करावे
प्रत्येकाच्या डोक्याला कफन घट्ट बांधलेय ना?
हे न चुकता काळजीपूर्वक तपासावे .....

## मी निराश नाही रे !

आकाशव्यापी वेदना किती दिवस कोंडून ठेवणार
प्रश्नांचा घेराओ तर वाढतच चाललाय्
कोण येणार माझ्या सोडवणुकीसाठी
इथले सत्ताधीश ? जे ऑबेरॉय — शेरेटोनची
सोनेरी फित कापताना
माझी आठवण संवयीने काढतात
अन् वर्तमान - पत्रवाल्यांची हेडलाईनची सोय करतात
इथले विचारवंत ? ते तर त्यांचेच हुजरे
संगीतकाराने दिलेल्या चालीत
शब्द बसविणाऱ्या गीतकारा सारखे.
इथली स्टुडन्टस् कम्युनिटी ! डोक्याचे रितेपण सहन करून
पँटच्या वाढीव बॉटमसाठी खवळून उठणारी
इथला श्रमजीवी ? जो फक्त बोनस साठी .....
किंवा...... अथवा...... इत्यादि...... वगैरे वगैरे.

तरीही मी स्पष्ट सांगतो मी निराश नाही रे
त्या पहा मला दिसताहेत मंद ज्योति
मी हक्काने सांगू पाहतोय्...
ज्यांचे डोळे अजून जिवंत आहेत त्यांना
विक्राळ वाऱ्यापासून जगविण्यासाठी
त्यांच्या भोवती भिंती उभारायला
झीज सोसून देखील तेल पुरवायला - वाती वळायला.

मी स्पष्ट सांगतो मी निराश नाही रे
प्रश्नांच्या घेराओतून मुक्त झालेला मी
आकाशव्यापी भडकलेल्या ज्वाळा - वेदनारहित मी
मी स्पष्ट सांगतो मी निराश नाही रे
एक उजळ - शिल्पित स्वप्न पाहतोय् रे मी

# किती दिवस ?

फुल्यांचे ठसे मारलेल्या कागदांनी मढविलेला हार
ज्याला सर्वजण आपण लोकशाही म्हणतो तो.
जर मिरवू लागला सतत त्यांच्याच गळ्यात,
ज्यांचे हात सदोदित पोटावर असतात
तर मग ज्यांचे पोट हातावर आहे
त्यांनी भुंडे गळे घेऊन किती दिवस फिरावे ?
ज्यांच्या गळ्यात हार आहे ते जर त्याला
समजू लागले स्वतःची मक्तेदारी अन्
त्याच्या रक्षणासाठी त्याच्याचखाली दडवू लागले
लोड केलेल्या संगिनी अन् झुकलेले तराजू
तर स्वतःचा आवाज ज्यांना गवसला आहे
त्यांनी दाताखाली जीभ धरून कसे जगावे ?
मुक्तिगीतांचा टाहो फोडून पाहणाऱ्यांनी
भिडेपोटी किती काळ गाभण राहावे ?
ज्यांचे पोट हातावर आहे
त्यांनी भुंडे गळे घेऊन किती दिवस फिरावे ?

# माफ करा

माझ्या हृदयात पेटलेला जाळ
मलाच का जाळीत आहे.
शिवशिवणारे माझे हात
माझ्याच गळ्याभोवती का येत आहेत.
प्रकाशाकडे धावणारे माझे पाय
खोल खोल का रूततांहेत.
हे दुखरेपण देखिल सांगण्याची सोय नाही
' क्रान्तीवाला ' ' उत्थानवाला ' हसतात लोक मला
... ज्यांनी ' लेबल ' चिकटवून घेतले आहे ते सुद्धा.
जगणार आहे मी घट्ट करून मन
कारण हाही काळोख देतो मला
पहाटेचे एक निश्चित आश्वासन.
तुम्हीही आता हसला असाल, हसा
दोष तुमचा नाही. दोष माझाच...
माफ करा, सरडा होऊन जगणे मला शक्य नोहे.

## संदर्भासाठी

तसे दगडांना देखिल संदर्भ असतात
यांच्या चेहऱ्यांना तसे काहीच नसते
नाही म्हणायला चारचौघांना जसे असते
व्यावहारिक सोयीसाठी तसे यांनाही नाव दिले जाते.

... तर आमच्या खाती असलेले हे संदर्भहीन चेहरे
चढवून सैद्धांतिक मुखवटे फिरताहेत गल्लोगल्ली
निधड्या छातीने आम्हीच त्यांना रोखू शकतो.
मुखवटे त्यांचे फाडू शकतो. कारण ...
आमच्या तीक्ष्ण नजरा नोंदवून बसल्याहेत त्यांना

गांडूच्या दिंडीत टाळ पिटीत फिरताना
जांघांच्या जंगलात बेभानपणे हरवताना
थैलीशहाचे इमानदार हुजरे होताना
इम्पोर्टेड कडब्यावर पोसले जाताना
दोस्तानो, आपण आपल्या संदर्भाशी घट्ट
बांधले जायला हवे.
(कडब्याच्या लालचीने काही पळालेले त्यांचे असो)

संदर्भा-संदर्भानेच इतिहास लिहिला जात असतो
इतिहास इमानदार असतो अन्
इतिहास घडविणारे दोस्तांनो तुम्ही-आम्हीच असतो
सैद्धांतिक मुखवटे चढविलेले इतिहासाची चक्रे उलटी फिरवू पाहातात.
नव्या युगाचा, नव्या जगाचा संदर्भ घेऊन जगणारे
दोस्तांनो, तुम्ही इतिहास घडवित असता
संदर्भहीन चेहरे गाडता गाडता
तुम्हीच इतिहास होत जाता
इतिहास इमानदार असतो अन्
तो घडविणारे तुम्हीच असता.

# गर्भार शांततेत —

ह्या रस्त्याने जाताना…
कदाचित् घुबडांचे चित्कार बंद झाल्यासारखे वाटतील
रक्तपिपासू टोळीवाले परागंदा झालेसे वाटतील
हिंस्र श्वापदांचे कळप गडप झालेसे वाटतील
तरी देखिल मी फुलपांखरांचे पंख लावून उडू इच्छित नाही
ह्यांची पाठराखण करणारे तैनाती कलम बहाद्दर
माझे पंख कधी कलम करतील याची शाश्वती देऊ शकत नाही.

ह्या रस्त्याने जाताना…
निष्पर्ण भकास खोडांना मोहरलेली झाडे समजून
मला जाता येणार नाही मोहरून
मला गावेच लागणार त्यांच्यासाठी गळा भरून
म्हणून कोकीळेचा कंठ लावून गाऊ इच्छित नाही
हे लाकूडतोडे … त्यांनी बाळगलेल्या फरशा… कुऱ्हाडी
माझ्या बुलंद गळ्यावरून केव्हां फिरतील याचा देखिल नेम नाही.

ह्या रस्त्याने जाताना…
हजार दारे-हजार खिडक्या असलेल्या घरातील संसारावर
माझे डोळे सहेतुक खिळलेच जाणार
मी माझ्या डोळ्याना लोलक बांधू इच्छित नाही
कल्पनाधिष्ठित् आभासातून फाटक्या घरांच्या ठायी
'उषाकिरण' असलेली मी पाहू इच्छित नाही, पाहू शकत नाही.

मी फुलपाखरांचे पंख लावून उडणार नाही
कोकीळेचा कंठ लावून गाणार नाही
डोळ्याना लोलक बांधून फिरणार नाही
ह्या गर्भार शांततेत मी निर्भर राहूच शकणार नाही.

## छावणी हलते आहे

तू गात रहा भर चौकात
इथल्या सप्तसुरात न बसणारे तुझे गाणे
बाजूला ठेव
कशाला हवाय् तुला त्यांच्या सारखा साज-बाज

छान झाले. तू गाण्यातले सूर बदललेस
पण तू असा भांबावलेला कां
अरे, सूरच काय, इथला सूर्य देखिल बदलायचा आहे
माहित आहे मला
ठेवता येणार नाही तुला
तुझ्या डायरीत झुळुकांची नोंद
ठेवावा लागेल फक्त वादळांचाच हिशेब
तरीही तू गात रहा

तू गात रहा
भुके कंगालांचा जूलूस होऊन
तू गात रहा
मुक्तिवाहिनी किंवा व्हिएतनामी होऊन
तू गात रहा
चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन

तू गायलाच हवे
त्यांनी त्यांच्या बंदिस्त सूर्याकडे कूच करे पर्यंत
तू गा… गा…… गा…… बिनधास्त गा
छावणी हलू लागली आहे
छावणी हलते आहे.

# युगाच्या इतिहासा साठी

नसेल सापडत त्यांना माझ्या गाण्यात
त्यांच्याच भाषेत सांगायचे तर
गोळीबंद अनुभवाचा कलात्मक आविष्कार
नसेलही संबंध माझ्या गाण्याचा त्यांच्या मते
कलाकृतीच्या घाटाशी त्यानी ठरविलेल्या आकृतीबंधाशी
नसेलही जोडीत नाते माझे गाणे......हेही त्यांच्याच मते
अमूर्त प्रगल्भ चिंतनशीलतेशी
पर्यायाने..................
मला नक्की सांगता येणार नाही कशाशी
त्यांचे असो..... तसे त्यांना काहीच देणे घेणे नसते
आपण आपले गाणे गात राहणार
त्यांचे काय
ते जगत असतात
साहित्याचा इतिहास घडविण्यासाठी
आपण जगतो आहोत
युगाचा इतिहास घडविण्यासाठी

# अंकल हो

तुझ्या दुर्दम्य इच्छाशक्तीतून
साकार झालेल्या लक्षावधि सागवानी श्रद्धा
कुठचेही किडूक-मिडूक पोखरू शकले नाही त्यांना
कुठचेही वादळ तुफान उलथवू शकले नाही त्यांना
कोणतेही घाव तोडू फोडू शकले नाही त्याना

तुझ्या ध्येयवादी गतीशील प्रेरणेतून
उभारलेल्या कृतीशील बाहूनी
गिधांडाची टोळी अखेर हाकलवून लावली
दोन भावांनी कडाडून मारलेली मिठी बघून
खाचरातील भाताची रोपे तीस वर्षानंतर
अधिक हिरवीगार होऊन डोलत राहीली
अंकल हो, तुझ्या स्वप्नातील देश
सत्यात अवतरला आहे
आता तुझ्या देशातील आकाश शांत असेल
खाचरातील पाणी बॉम्बगोळ्यांह उसळत नसेल

तर अंकल हो तुझी आठवण होण्याचे एक कारण
आता ह्या गिधाडांच्या घिरट्यानी
आमचे आकाश विटाळत आहे
त्यांच्या पंखाच्या सावलीने
आमच्या मातीत हलचल सुरू आहे
अंकल ही एका प्रदिर्घ युद्धाची सुरूवात आहे.

तुझी आठवण होण्याचे आणखी एक कारण
एक हात थरथरत्या चापावर ठेवून
खंदकात देखिल कवितेच्या ओळी रचणारे तुझे कलावंत
आता खंदकाबाहेर आले असतील.

अंकल तू आता नाहियेस्
तू त्यांना दिलेस तसेच सामर्थ्य आम्हाला दे
आम्ही आता खंदकाच्या दिशेने जात आहोत.

# शेवाळ

कुणीतरी म्हणे ह्या आभाळाचे खांब
पोलादी हातानी धरून गदगदा हलविले
अन् घोरपडीसारखं चिकटलेलं चांदणं
पावसासारखं विहिरीत येऊन पडलं

अंधाराच्या कावडी वाहणारे निर्जीव खांदे
सुसाट होऊन विहिरीकडे धावले
सळसळत्या पिंपळपानांच्या आवाजात पोहरे टाकले गेले
अंधार घेऊनच सरसर वर येत गेले

अंधाराच्या कावडी वाहणारे निर्जीव खांदे
सुन्न होऊन मागे फिरले

वरती उभ्या अंधाराच्या वांझ कावडी
खाली चांदण्यांनी गर्भार झालेली विहिर
गेंड्याच्या कातडीसारखे पसरलेले हे शेवाळ
दिवसेंदिवस किती निबर होत जाणारहे
हे दुखरे खांदे अंधाराच्या कावडी किती दिवस वाहणारहे

## पोर्टर

REFBK-0021776
REFBK-0021776
२३९२ २९६८८

त्या सर्वांनी आपापली गाठोडी व्यवस्थित करून
परतीच्या प्रवासाला निर्विकार सुरुवात केली
रात्रीची शेवटची गाडी निघून गेल्यावर
मधल्या स्टेशनवरच्या पोर्टरसारखी अवस्था झाली
आपण चित्कारणाऱ्या मनाला
स्वप्नांची आमिषे दाखवून
जडशील अंधाराला चिर न पाडता गपगार झोपविले
अंतिम ध्येय-अंतिम सत्य-शेवटी अंतिम आपण
सारे काही वास्तवतेच्या दाहकतेवर कसास लावले
कुठच्याही भूल भुलैय्याला
रंगारूपाला न भाळलेले आपण
आपल्या सामाजिक जगण्यातून साकार झालेलो आपण
आपण किती एकाकि संथ विरघळत चाललोय्
—पहिल्या गाडीची वेळ झाली असावी
हा रात्रीचा पोर्टर किती बेहोशपणे घंटा वाजतोय्
ह्या जडशील अंधाराला किती मोठी चिर पाडतोय्.